# महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण
# Maharashtra Water Resources Regulatory Authority
## (MWRRA)

9th Floor, Centre-1, World Trade Centre, Cufffe Parade, Mumbai - 400005. Tel.: 2215 2019 Fax.: 2215 3765 E-mail: mwrra@mwrra.org


क्र. मजनिप्रा/२०१४/PRCL/TIDC/८६/१६९ दिनांक : २७/०३/२०१५

प्रति,

**प्रधान सचिव (जसंप्र व वि),**
जलसंपदा विभाग, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

[लक्ष्यवेध - श्री. प्र. गो. मांदाडे, उपसचिव (जसं)]

विषय : मांजरपाडा - २ (गुगुळ, पार, तापी) प्रवाही वळण योजना ता. सुरगणा, जि.नाशिक प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

संदर्भ : जलसंपदा विभागाचे पत्र क्र. संकिर्ण २०१४/(९२/२०१४)/जसंअ दि. १६/०२/२०१५

आदिवासी व डोंगरी भागातील जनतेच्या विकासासाठी व महाराष्ट्राच्या हितासाठी मांजरपाडा - २ (गुगुळ, पार, तापी) प्रवाही वळण योजना होणे आवश्यक असून सदर प्रकल्पास विशेष बाब म्हणून प्राधिकरणाने नवीन प्रकल्प गृहीत न धरता स्थिरीकरण योजना म्हणून मान्यता प्रदान करण्याविषयी विनंती जलसंपदा विभागाने संदर्भिय पत्रान्वये केलेली आहे.

मांजरपाडा - २ योजनेद्वारे पार नदी खोऱ्यामधील १७.९८ दलघमी पाणी तापी खोऱ्यामधील गिरणा उपखोऱ्यामध्ये ११.१४ किमी लांबीच्या बोगद्याद्वारे वळवून ते पाणी चणकापूर प्रकल्पाच्या जलाशयामध्ये साठविण्याचे नियोजन आहे. चणकापूर प्रकल्पाच्या बिगरसिंचन पाण्याची मागणी वाढल्याने कमी झालेल्या ४९१५ हेक्टर सिंचन क्षमतेच्या पुनर्स्थापनेसाठी सदर पाण्याचा विनियोग होणार आहे. सदर योजनेसाठी रु ५३७.४५ कोटी खर्च येणार असून लाभ व्यय गुणोत्तर १.१० येते.

कृ. मा. प.

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम २००५ च्या कलम ११(च) नुसार प्राधिकरण मुख्यत्वे मा. राज्यपाल यांनी वेळोवेळी दिलेल्या निदेशांच्या अधीन राहून तसेच एकात्मिक राज्य जल आराखड्याशी सुनिश्चिती करुन प्रकल्पांना मान्यता देते. नाशिक जिल्ह्यामध्ये अनुशेष नाही तसेच मा. राज्यपाल यांच्या दि. १०/०३/२०१५ रोजीच्या वर्ष २०१५-१६ च्या निदेशातील परिच्छेद १७ नुसार जो पर्यंत राज्य शासन चालू प्रकल्पांवरील निधीच्या उपलब्धतेवर परिणाम न होऊ देता निश्चित कालमर्यादेत प्रकल्प पूर्ण होण्याच्या दृष्टीने पुरेसा अतिरिक्त निधी उपलब्ध करुन देत नाही, तोपर्यंत नवीन प्रकल्पांचे काम हाती घेता येणार नाही.

तापी खोऱ्यामधील गिरणा उपखोऱ्याचा जल आराखडा अद्यपि तयार झालेला नसल्याने व मा. राज्यपाल यांच्या वर्ष २०१५-१६ च्या निदेशाशी सदर प्रस्ताव सुसंगत नसल्याने सद्यस्थितीत तो प्राधिकरणाच्या कलम ११(च) च्या मान्यतेशिवाय परत पाठविण्यात येत आहे. अशा आशयाचे अभिप्राय प्राधिकरणाने समक्रमांकाचे पत्र क्र. ४२१ दि. १३/०६/२०१४ अन्वये कळविलले आहेत.

सहपत्र - प्रकल अहवाल,
टिप्पणी,
नकाशा धारिका,

O/C [signature] २०/३/१५
(डॉ. सुरेश कुलकर्णी)
सचिव,

प्रत

१) कार्यकारी संचालक, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, सिंचन भवन, आकाशवाणी चौक, जळगांव - ४२५ ००१.

२) मुख्य अभियंता, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, सिंचन भवन, आकाशवाणी चौक, जळगांव - ४२५ ००१.

Record attached file of three letters
[signature] EE: 30/3
(A.S. More)